**L. C. BILL No. XVIII OF 2026.**

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

**२०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १८.**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**(विधानपरिषदेने दिनांक ७ जुलै २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

२०१७ चा महा. ६.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे:-

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (चौथी सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ६ ची सुधारणा.

२०१७ चा महा. ६.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ६ मध्ये, पोट-कलम (२) मधील,-

(१) विद्यमान परंतुकाआधी, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईलः-

"परंतु, राज्य शासनाची किंवा केंद्र सरकारची कोणतीही संस्था किंवा भारतातील राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाची कोणतीही संस्था, जरी अशी संस्था विद्यापीठ क्षेत्राबाहेर स्थित असली तरी देखील तिला विद्यापीठाशी संलग्न करता येईल किंवा विद्यापीठाच्या विशेषाधिकाराचे लाभ देता येतीलः";

(२) विद्यमान पहिल्या परंतुकामधील, "परंतु" या मजकुराऐवजी, "परंतु आणखी असे की" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(३) विद्यमान दुसऱ्या परंतुकामधील, "परंतु आणखी असे की" या मजकुराऐवजी, "परंतु तसेच" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ८ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मधील, पोट-कलम (६) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :-

"(६) जेव्हा जेव्हा राज्य शासनाला असे करणे इष्ट असल्याचे वाटेल तेव्हा, राज्य शासनाला, त्याने यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यामार्फत कोणत्याही संलग्न, संचालित किंवा स्वायत्त महाविद्यालयाची, मान्यताप्राप्त परिसंस्थेची किंवा विद्यापीठाची आणि विद्यापीठ विभागांची तपासणी करवून घेण्याचा हक्क असेल.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ यामध्ये नवीन कलम ३५क समाविष्ट करणे.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :-

अध्ययन प्रशाला.

"**३५क.** (१) विद्यापीठामधील प्रत्येक विद्याशाखेअंतर्गत अध्ययन प्रशाला असतील.

(२) संबंधित विषयांमध्ये किंवा विषयांच्या गटांमध्ये अध्ययन व संशोधन पाठ्यक्रम चालविणारे विद्यापीठ विभाग व केंद्रे, संबंधित अध्ययन प्रशालेच्या अधिपत्याखाली कार्य करतील.

(३) संचालक हा, प्रत्येक अध्ययन प्रशालेचा प्रमुख असेल, ज्याला, विद्यापीठामध्ये प्राध्यापक किंवा सहयोगी प्राध्यापक म्हणून अध्यापन करण्याचा किमान पाच वर्षांचा अनुभव असलेल्या विभाग प्रमुखांमधून, कुलगुरूंद्वारे तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीकरिता, आळीपाळीने, नामनिर्देशित करण्यात येईल.

(४) अध्ययन प्रशालेचे कार्य व प्रशासन, अध्ययन प्रशालेच्या संचालकाचे नामनिर्देशन करण्याची कार्यपद्धती, संचालकाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांसह त्याच्या सेवेच्या अटी व शर्ती, परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ६५ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६५ मधील, "कोणतीही व्यक्ती" या मजकुराआधी, "पदसिद्ध सदस्याखेरीज" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७० मध्ये,- सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ७० ची सुधारणा.

(एक) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :-

"(१) जेव्हा व्यवस्थापन परिषदेव्यतिरिक्त, कोणत्याही प्राधिकरणाच्या निवडून आलेल्या सदस्याचे कोणतेही पद, त्याचा सर्वसाधारण पदावधी समाप्त होण्यापूर्वी रिक्त होईल तेव्हा, असे रिक्त पद, पोट-कलम (३) अन्वये घटित केलेल्या स्थायी समितीद्वारे, जी व्यक्ती, त्याच प्रवर्गातून उक्त प्राधिकरणावर निवडून जाण्यास अन्यथा पात्र असेल अशा व्यक्तीच्या नामनिर्देशनाद्वारे भरण्यात येईल.".

(दोन) पोट-कलम (२) मधील, "पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त" हा मजकूर वगळण्यात येईल.

**७.** मुख्य अधिनियमाच्या, कलम ७९ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :— सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ७९ ची सुधारणा.

**७९.** (१) प्रत्येक विद्यापीठामध्ये, केंद्र सरकार, राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण यांनी व्यवस्थापन केलेल्या व चालविलेल्या संस्थांव्यतिरिक्त, विद्यापीठांचे, संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे अध्यापक व इतर कर्मचारी यांच्या सर्व प्रकारच्या गाऱ्हाण्यांवर कार्यवाही करण्यासाठी व त्यावर निर्णय घेण्यासाठी एक लोकपाल असेल. लोकपाल.

(२) लोकपाल, राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांसह राज्य शासनाविरुद्धच्या गाऱ्हाण्यांवर आणि जी गाऱ्हाणी विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्रात येतात त्या गाऱ्हाण्यांवर कार्यवाही करणार नाही आणि त्यावर निर्णय घेणार नाही.

(३) कुलगुरू, राज्य शासनाशी विचारविनिमय करून, लोकपालाची नियुक्ती करण्यासाठी, जिल्हा न्यायाधीशाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या तीन सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या एका नामिकेची शिफारस करील.

(४) राज्य शासन, कुलगुरूंद्वारे शिफारस केलेल्या तीन व्यक्तींच्या नामिकेमध्ये समाविष्ट असलेल्या एका व्यक्तीची विद्यापीठासाठी लोकपाल म्हणून नियुक्ती करील.

(५) लोकपालाची, त्याने पद ग्रहण केल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या पदावधीकरिता नियुक्ती करण्यात येईल, आणि तो, आणखी एका पदावधीकरिता पुनर्नियुक्त करण्यासाठी पात्र असेलः

परंतु, लोकपाल, वयाची सत्तर वर्षे पूर्ण होईपर्यंत, पद धारण करील.

(६) राज्य शासनास, गैरवर्तनाचा किंवा गैरवर्तणुकीचा दोषारोप सिद्ध झाल्यावर, लोकपालाला पदावरून काढून टाकता येईल.

(७) लोकपालाला, उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधीशाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या व्यक्तीकडून यासंबंधात चौकशी केल्याखेरीज आणि लोकपालाला त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, पदावरून काढण्याचा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(८) लोकपाल, विद्यापीठाद्वारे निर्धारित करण्यात येईल असे, पारिश्रमिक व वाहन खर्च मिळण्यास हक्कदार असेल.

(९) लोकपाल, दोन्ही पक्षकारांना त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या गाऱ्हाण्यांवर निर्णय करील.

(१०) लोकपाल, गाऱ्हाणे दाखल केल्याच्या दिनांकापासून, व्यवहार्य असेल तितपत, तीन महिन्यांच्या कालावधीत कायद्यानुसार गाऱ्हाण्यांची सुनावणी घेईल, ती सोडवील व त्यावर निर्णय करील.

(११) विद्यापीठ, लोकपालाला प्रशासकीय सहाय्य पुरविण्यासाठी सहायक कुलसचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला विद्यापीठाचा अधिकारी प्रमुख असलेला एक कक्ष स्थापन करील.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ८१ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८१ मध्ये, पोट-कलम (१) मधील,—

(एक) खंड (ख) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईलः-

"(ख) या अधिनियमान्वये नियुक्त केलेल्या लोकपालाच्या निर्णयाने व्यथित झालेला कोणताही पक्षकार;";

(दोन) विद्यमान परंतुकातील, "तक्रार निवारण समितीचा" या मजकुराऐवजी, "लोकपालाचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १२१ ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम १२१ मध्ये, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईलः-

"(९) संलग्न महाविद्यालय, मान्यताप्राप्त परिसंस्था, विद्याशाखा, पाठ्यक्रम किंवा सॅटेलाइट-केंद्र बंद झाल्यास, राज्य शासनाकडून अनुदानित पदांवर नियुक्त केलेल्या अध्यापकांच्या, अध्यापकेतर कर्मचाऱ्यांच्या व इतर कर्मचाऱ्यांच्या अशा दायित्वांखेरीज, अशा बंद पडण्यामुळे बाधित झालेल्या अध्यापकांच्या, अध्यापकेतर कर्मचाऱ्यांच्या व इतर कर्मचाऱ्यांच्या आस्थापना व सेवा यांमधून उद्भवणाऱ्या सर्व दायित्वांसाठी व्यवस्थापन सर्वस्वी जबाबदार असेल.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १३७ ची सुधारणा.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३७ मध्ये, पोट-कलम (३) मधील, "विद्यापीठाची खाजगी विद्यार्थिनी म्हणून किंवा विद्यापीठाच्या पत्रव्यवहार पाठ्यक्रमासाठी किंवा अन्य कोणत्याही बहिस्थ पदवी किंवा पदविका पाठ्यक्रमासाठी" या मजकुराऐवजी, "विद्यापीठाच्या दूरस्थ शिक्षण केंद्राने सुरू केलेल्या पदवी किंवा पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थिनी म्हणून" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## उद्दिष्टे व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१६ चा महा. ४) हा, विद्याविषयक स्वायत्तता व अत्युच्च गुणवत्ता, लोकशाही प्रक्रियेद्वारे पर्याप्त प्रतिनिधित्व, उच्च शिक्षणाची अभिवृद्धी, त्याचे बळकटीकरण व विनियमन यांकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियमित केला आहे.

**२.** प्रभावी विद्याविषयक प्रशासनासाठी, मुनुष्यबळाचा अनुकूलतम वापर करण्यासाठी आणि सर्व विद्यापीठांमध्ये एकरूपता राखण्यासाठी, उक्त अधिनियमात नवीन कलम ३५-क समाविष्ट करून विद्यापीठाच्या प्रत्येक विद्याशाखेअंतर्गत 'अध्ययन प्रशाला' सुरु करण्यासाठी नवीन तरतूद करणे आवश्यक आहे असे वाटते.

**३.** विद्यमान तक्रार निवारण समितीच्या रचनेत, कुलसचिव, अधिष्ठाता, विधि अधिकारी यांसारख्या विद्यापीठ किंवा महाविद्यालयीन अधिकाऱ्यांचा, तसेच अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती, विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग या प्रवर्गातील एका अध्यापकाचा व अधिसभेने नामनिर्देशित केलेल्या महाविद्यालयाच्या एका अध्यापकेतर कर्मचाऱ्याचा समावेश असून ते या तक्रार निवारण समितीचे सदस्य आहेत. विद्यापीठांच्या तसेच महाविद्यालयांच्या किंवा परिसंस्थांच्या कर्मचाऱ्यांची गाऱ्हाणी या तक्रार निवारण समितीकडे दाखल केली जातात. गाऱ्हाण्यांच्या निवारणामध्ये विद्यापीठाच्या किंवा महाविद्यालयाच्या अधिकाऱ्यांचा सहभाग असल्यामुळे, निःष्पक्ष निवारण केल्याची सुनिश्चिती करणे कठीण होते. म्हणून, विद्यापीठे, संलग्न व स्वायत्त महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या कर्मचाऱ्यांच्या गाऱ्हाण्यांचे निःष्पक्ष, जलद व प्रभावी निवारण केल्याची सुनिश्चिती करण्यासाठी, उक्त अधिनियमात कलम ७९ बदली दाखल करून तक्रार निवारण समितीऐवजी लोकपालाची नियुक्ती करण्याचे प्रस्तावित केले आहे.

**४.** तसेच, शासकीय संस्थांचा विद्यापीठांशी सहयोग करणे सुलभ व्हावे यासाठी, राज्य शासनाने यथोचित प्राधिकृत केलेल्या प्राधिकरणामार्फत विद्यापीठे, विद्यापीठांचे विभाग व संलग्न परिसंस्था यांची तपासणी करणे राज्य शासनाला शक्य व्हावे यासाठी, विद्यापीठांच्या प्राधिकरणांशी संबंधित असलेल्या तरतुदी अधिक सुसंगत करण्यासाठी, लोकपालाच्या निर्णयांविरुद्ध अपील करण्याची तरतूद करण्यासाठी आणि त्यासंबंधी विवक्षित परिणामस्वरूप सुधारणा करण्यासाठी, उक्त अधिनियमाच्या कलम ६, ८, ६५, ७०, ८१, १२१ व १३७ यांमध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

**५.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २ जुलै २०२६.

**चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :-

**खंड ४(४) –** या खंडान्वये, अध्ययन प्रशालेचे कार्य व प्रशासन, अध्ययन प्रशालेच्या संचालकाचे नामनिर्देशन करण्याची कार्यपद्धती, संचालकाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांसह त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती, परिनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्याचा अधिकार, विद्यापीठाकडे घेण्यात आला आहे.

**२.** वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा वर नमूद केलेला प्रस्ताव हा सामान्य स्वरूपाचा आहे.

(शा.म.मु.) एचबी ८४५–३(४००-७-२०२६)

## सन २०२६ चे वि.प. विधेयक क्रमांक १८ – महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (चौथी सुधारणा) विधेयक, २०२६ याचे परिशिष्ट.

## (महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यातील उतारे )

## (सन २०१७ चा महा. अधिनियम क्रमांक ६)

**१.** ते **५.** ** ** **

**६.** (१) ** ** **

विद्यापीठाची अधिकारिता आणि प्रवेशाचे विशेषाधिकार बहाल करणे.

(२) कलम ३ च्या पोट-कलम (३) च्या तरतुदींस अधीन राहून, विद्यापीठ क्षेत्राच्या आत स्थित असलेली कोणतीही शैक्षणिक परिसंस्था, विद्यापीठाच्या संमतीने व राज्य शासनाच्या मंजुरीने असेल त्याव्यतिरिक्त अन्य बाबतीत, राज्य मुक्त विद्यापीठाच्या आणि अन्य कोणत्याही विद्यापीठाशी किंवा महाविद्यालयांशी विद्यापीठाचा, महाविद्यालयांचा सहयोगी संशोधन किंवा प्रकल्प यांचा अपवाद करून विधिद्वारे स्थापित अशा कोणत्याही अन्य विद्यापीठाशी कोणत्याही प्रकारे सहयोगी होणार नाही किंवा त्यांचा कोणताही विशेषाधिकार मिळविण्याचा प्रयत्न करणार नाही :

परंतु, जर एखादी सार्वजनिक किंवा खाजगी, भारतीय किंवा विदेशी शैक्षणिक परिसंस्था, ज्या विद्यापीठाची अधिकारिता कोणत्याही राज्यापुरती किंवा क्षेत्रापुरती मर्यादित करण्यात आलेली नसेल अशा एखाद्या विद्यापीठाशी संबंध ठेवण्याची किंवा अशा विद्यापीठाचे विशेषाधिकार मिळण्याची मागणी करत असेल तर, असे सहयोगी होण्यास किंवा असे विशेषाधिकार मिळविण्यास, राज्य शासन परवानगी देऊ शकेल :

परंतु, आणखी असे की, ज्या विद्यापीठाची अधिकारिता कोणत्याही राज्यापुरती किंवा क्षेत्रापुरती मर्यादित नसेल असे एखादे विद्यापीठ, विद्यापीठ क्षेत्रात स्वतः किंवा कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी, भारतीय किंवा विदेशी विद्यापीठ या सोबत संशोधनाचे केंद्र किंवा इतर युनिट प्रस्थापित करू इच्छित असेल आणि जर असा सहयोग विदेशी विद्यापीठ किंवा परिसंस्थेसोबत असेल तर, त्यास, राज्य शासनाच्या मंजुरीने आणि केंद्र सरकारच्या मंजुरीने देखील तसे करता येईल.

(३) व (५) ** ** **

**७.** ** ** **

**८.** (१) ते (५) ** ** **

राज्य शासनाचे विद्यापीठांवर नियंत्रण असणे.

(६) राज्य शासनाला, राज्य शासनाचे उप सचिव यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यामार्फत कोणत्याही संलग्न, संचालित किंवा स्वायत्त महाविद्यालयाची, मान्यताप्राप्त परिसंस्थेची किंवा विद्यापीठ विभागाची तपासणी करवून घेण्याचे अधिकार असतील.

(७) व (८) ** ** **

**९.** ते **६४.** ** ** **

लागोपाठच्या दुसऱ्या मुदतीकरिता सदस्य असण्यास अपात्र असणे.

**६५.** व्यवस्थापन परिषदेचा कोणताही सदस्य किंवा अभ्यास मंडळाचा अध्यक्ष म्हणून, निवडून आलेली, नामनिर्देशित केलेली, नियुक्त केलेली किंवा यथास्थिति, स्वीकृत केलेली कोणतीही व्यक्ती, लागोपाठच्या दुसऱ्या मुदतीकरिता पात्र असणार नाही :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास, जी कोणतीही व्यक्ती, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची पहिल्यांदा सदस्य होती-मग ती असा सदस्य किंवा अभ्यास मंडळाचा अध्यक्ष म्हणून निवडून

आली असेल, नियुक्त केली असेल, नामनिर्देशित केली असेल किंवा यथास्थिति, स्वीकृत केली असेल तर-ती या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, पहिल्यांदा नियुक्त केली असेल, नामनिर्देशित केली असेल, निवडून आली असेल, स्वीकृत केली असेल तर तिने, लागोपाठच्या मुदतीकरिता लाभ घेतला असल्याचे मानण्यात येणार नाही.

**६६.** ते **६९.** ** ** **

प्रासंगिक रिक्त पद व ते स्थायी समितीने भरणे.

**७०.** (१) व्यवस्थापन परिषदेव्यतिरिक्त विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा इतर मंडळाच्या पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त किंवा कुलपतीने नामनिर्देशित केलेल्या सदस्याव्यतिरिक्त एखाद्या सदस्याचे पद, त्याचा नेहमीचा पदावधी संपण्यापूर्वी रिक्त होईल तेव्हा, पोट-कलम (३) अन्वये गठित करण्यात आलेल्या स्थायी समितीकडून असे रिक्त पद एखाद्या व्यक्तीस नामनिर्देशित करून, भरण्यात येईल, जी अन्यथा त्याच प्रवर्गातून उक्त प्राधिकरणावर किंवा मंडळावर निवडून येण्यास पात्र असणारी व्यक्ती असेल.

(२) विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त, एखाद्या सदस्याचे पद रिक्त होईल त्याबाबतीत, ते पद शक्य तितक्या लवकर, प्राधिकरणाने, मंडळाने किंवा संबंधित अधिकाऱ्याने नामनिर्देशन किंवा निवडणूक किंवा, यथास्थिति, स्वीकृती याद्वारे भरण्यात येईल. अशा प्रकारे नामनिर्देशित केलेली, निवडून दिलेली किंवा स्वीकृत केलेली व्यक्ती ही, अन्यथा त्याच प्रवर्गातून उक्त प्राधिकरणावर किंवा मंडळावर नामनिर्देशित करण्यास किंवा निवडून येण्यास किंवा स्वीकृत करण्यास पात्र असलेली व्यक्ती असेल. अशा प्रकारे नामनिर्देशित करण्यात आलेली, निवडून आलेली किंवा स्वीकृत करण्यात आलेली व्यक्ती ही ज्याच्या पदावर तिचे नामनिर्देशन झाले असेल त्या सदस्याने, जर ते पद रिक्त झाले नसते तर, जितक्या मुदतीकरिता ते पद धारण केले असते तितक्याच मुदतीकरता ते पद धारण करील.

(३) व (४) ** ** **

**७१.** ते **७८.** ** ** **

तक्रार निवारण समिती.

**७९.** (१) प्रत्येक विद्यापीठामध्ये, राज्य शासन, केंद्र सरकार किंवा स्थानिक प्राधिकरण यांनी व्यवस्थापन केलेल्या व चालविलेल्या संस्थांव्यतिरिक्त, विद्यापीठांचे, संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे अध्यापक व इतर कर्मचारी यांच्या, राज्य शासन व त्यांचे अधिकारी यांच्या विरुद्धच्या तक्रारीव्यतिरिक्त, इतर सर्व प्रकारच्या आणि विद्यापीठाच्या व महाविद्यालय न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्रात येत नाहीत अशा तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी एक तक्रार निवारण समिती असेल.

(२) विद्यापीठ, तक्रार निवारण समितीला प्रशासकीय साहाय्य देण्यासाठी सहायक कुलसचिवापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा विद्यापीठाच्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली एक तक्रार निवारण कक्ष स्थापन करील.

(३) तक्रार निवारण समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेलः-

(क) कुलगुरुने नामनिर्देशित केलेला, जिल्हा न्यायाधीशाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा सेवानिवृत न्यायाधीश - अध्यक्ष ;

(ख) कुलगुरुने नामनिर्देशित केलेला एक अधिष्ठाता ;

(ग) कुलपतीने व्यवस्थापन परिषदेवर नामनिर्देशित केलेली व्यक्ती ;

(घ) कुलसचिव ;

(ङ) अधिसभेने आपल्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेला, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्गातील एक अध्यापक आणि एक अध्यापकेतर कर्मचारी ;

(च) विद्यापीठाचा विधि अधिकारी-सदस्य-सचिव.

(४) तक्रार निवारण समितीचा अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त न्यायाधीशाचे आणि सदस्य म्हणून अधिष्ठात्याचे नामनिर्देशन हे, कुलगुरू प्रत्येक प्रकरणी वेळोवेळी निश्चित करील अशा, एकूण तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीसाठी असेल.

(५) तक्रार निवारण समितीचा अध्यक्ष म्हणून नामनिर्देशित केलेला सेवानिवृत्त न्यायाधीश, विद्यापीठाकडून निश्चित करण्यात येईल असे पारिश्रमिक व वाहनभत्ता मिळण्यास हक्कदार असेल.

(६) तक्रार निवारण समिती व्यवहार्य असेल तेथवर, तक्रार दाखल केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत कायद्यानुसार तक्रारीची सुनावणी, समझोता करील व त्यावर निर्णय देईल.

(७) दोन्ही पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्रात नसलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवेसंबंधीची गाऱ्हाणी किंवा तक्रारी विचारार्थ स्वीकारणे व त्यावर निर्णय देणे हे तक्रार निवारण समितीसाठी कायदेशीर असेल.

**८०.** ** ** **

**८१.** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा संविदेत काहीही अंतर्भूत असले तरी – अपील करण्याचा अधिकार.

(क) ** ** **

(ख) जो या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या तक्रार निवारण समितीच्या निर्णयाने व्यथित झाला असेल;

अशा राज्य शासनाकडून, केंद्र सरकारकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून व्यवस्थापन करण्यात आणि चालविण्यात येत असेल असे महाविद्यालय किंवा परिसंस्था वगळता, या अधिनियमान्वये नियमन केलेल्या कोणत्याही विद्यापीठातील किंवा इतर कोणत्याही विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयातील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेतील कोणत्याही अध्यापक किंवा अन्य कर्मचारी यास वरील अपील करण्याचा हक्क असेल व अशा कोणत्याही आदेशावरील अपील न्यायाधिकरणाकडे दाखल करण्यात येईल :

परंतु, एखाद्या बाबीचा निर्णय, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाला न्यायालयाकडून किंवा न्यायाधिकरणाकडून आधीच करण्यात आला असेल किंवा ती बाब अशा न्यायालयासमोर किंवा न्यायाधिकरणासमोर प्रलंबित असेल किंवा हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी कोणत्याही वेळी बडतर्फीचा, पदावरून काढून टाकण्याचा, अन्यथा सेवासमाप्तीचा, सक्तीच्या सेवानिवृत्तीचा किंवा पदावनतीचा आदेश किंवा तक्रार निवारण समितीचा निर्णय देण्यात आला असेल आणि ज्या बाबतीत अपील दाखल करण्याची मुदत टळून गेली असेल अशा कोणत्याही प्रकरणी असे कोणतेही अपील न्यायाधिकरणाकडे दाखल करता येणार नाही.

(२) ते (४) ** ** **

**८२. ते १३६.** ** ** **

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठा-करिता विशेष तरतुदी.

**१३७.** (१) व (२) ** ** **

(३) महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागातील किंवा अन्य कोणत्याही प्रदेशातील कोणत्याही विद्यार्थीनीस, विद्यापीठाची खाजगी विद्यार्थिनी म्हणून नाव नोंदविता येईल किंवा विद्यापीठाच्या पत्रव्यवहार पाठ्यक्रमासाठी किंवा अन्य कोणत्याही बहिस्थ पदवी किंवा पदविका पाठ्यक्रमासाठी प्रवेश घेता येईल.

(४) ते (९) ** ** **

**१३८.** ते **१४८.** ** ** **

**अनुसूची.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १८.]**

**[महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,**
**२०१६ यामध्ये आणखी सुधारणा**
**करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.**]**

**(विधानपरिषदेने दिनांक ७ जुलै २०२६ रोजी**
**संमत केल्याप्रमाणे.)**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव ( ३ ),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई